आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ३ वाजता

२ ऑक्टोबर २०२३ – सोमवार

देशभरात आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली जात आहे. यानिमित्त देशासह जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. नवी दिल्लीत महात्मा गांधी यांच्या राजघाट या समाधीस्थळी आज सर्वधर्म प्रार्थना झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राजघाट इथं जाऊन पुष्पांजली अर्पण केली. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी विजय घाटावर जाऊन लालबहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली वाहिली. गुजरात मध्ये आज गांधी जयंतीनिमित्त मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी सर्वधर्मीय प्रार्थनेत सहभाग घेतला. साबरमती आश्रमात देखील आज विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**<><><><><><><>**

राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं बापूजी आणि शास्त्रीजींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. राजभवन परिसरात आज स्वच्छता अभियान राबविण्यात आलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा इथं राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचं वास्तव्य राहिलेल्या सेवाग्राम आश्रमाला भेट दिली आणि प्रार्थना केली.

सोलापुरात आमदार प्रणिती शिंदे यांनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला आणि माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. गोंदियात आज युवकांनी शांतीचा संदेश देण्यासाठी सायकल रॅली काढली आणि माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत पर्यावरणपूरक उपक्रम आयोजित केले. यवतमाळमध्ये शांती सलोखा सद्भावना रैली काढण्यात आली.

<><><><><><>

स्वच्छता आणि सरकारी कार्यालयातील प्रलंबित कामांचा निपटारा यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या एका विशेष मोहीमेचा तिसरा टप्पा आजपासून सुरू झाला. ३१ ऑक्टोबरपर्यंत ही मोहिम सुरू राहणार आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यात विविध ठिकाणी साफ सफाई मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं. आकाशवाणी मुंबईच्या कार्यालयातही विविध विभागातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिसराची स्वच्छता केली.

<><><><><><>

स्टाफ सिलेक्शन कमिशन अर्थात कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षा लवकरच २२ भारतीय भाषांमध्ये घेतल्या जातील, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी काल केली. सर्व भाषिक उमेदवारांना एकसमान संधी मिळावी ही सरकारची इच्छा असल्याचं ते म्हणाले. नवी दिल्लीत आयोजित भारतीय भाषा परिषदेत ते बोलत होते.

<><><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात नांदुरा नजीक मजुरांना घेऊन जाणाऱ्या मिनी ट्रकला आज पहाटे अपघात होऊन पाच जण जागीच ठार झाले. तर इतर पाच जखमी झाले. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ जवळ वडनेर भोलजी फाट्याजवळ हा अपघात झाला. हे मजूर परप्रांतीय होते.

**<><><><><><><>**

दिल्ली पोलिसांनी आज एका दहशतवाद्याला अटक केली असून तो आयसिसच्या पुण्यातल्या गटाशी संबंधित होता. या दहशतवाद्याचं नाव राष्ट्रीय तपास संस्थेच्या फरार यादीत होतं आणि त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**<><><><><><><>**

मेरी माटी मेरा देश अंतर्गत **नाशिक** जिल्ह्यात सुरगाणा इथं आज अमृत कलश यात्रा निघाली होती. दिल्लीतल्या अमृतवाटिकेत गावातली माती नेली जाणार असल्यानं सर्वांना अभिमान वाटेल, असं केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार म्हणाल्या. **ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी** तालुक्यात राजनोली, पिंपळघर, कोनगांव आणि पिंपलस या गावांमधल्या अमृत कलशयात्रेत दोनशे पेक्षा अधिक लोकांनी भाग घेतला.

**<><><><><><><>**

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आज ३ कांस्य पदकांची कमाई केली. महिलांच्या दुहेरी टेबल टेनिस स्पर्धेत ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी यांना उत्तर कोरियाच्या खेळाडूकडून ३ विरुद्ध ४ गेमने पराभव पत्करावा लागला. त्यामुळं त्यांना कांस्य पदकावर समाधान मानावं

लागलं. भारतीय पुरुष आणि महिला खेळाडूंनी आज 3 हजार मीटर वेगवान स्केटिंग रिले स्पर्धेत आपापल्या गटात कांस्यपदक मिळवलं. आजच्या विजयांसह भारताची एकूण पदकसंख्या ५५ झाली असून यात १३ सुवर्ण, २१ रौप्य आणि २१ कांस्य पदकांचा समावेश आहे. भारतानं पदकतालिकेत आपलं चौथं स्थान कायम राखलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तजिंदर पाल सिंग तूर याचं गोळा फेक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. तसंच त्यांनी कार्थिका जगदीश्वरन, हिरल साधू आणि आरथी कस्तुरी राज या महिला स्केटिंग संघाला विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत. आशियाई स्पर्धांमध्ये नेमबाजी, नौकानयन, टेनिस आणि वुशू या खेळांमध्ये पदकं पटकावलेल्या खेळाडूंचा आज केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग सिंग ठाकूर यांनी सत्कार केला. या खेळाडूंनी देशासाठी अभिमानास्पद कामगिरी केली असून खेलो इंडिया उपक्रमामुळे इच्छित निकाल समोर येत असल्याचं त्यांनी सांगितलं. हे खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदकं मिळवत आहेत असं ठाकूर म्हणाले.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थानातल्या चित्तोडगड इथं सात हजार कोटी रूपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. देशातले आकांक्षी जिल्हे निवडून तिथं विकास केला जात असल्याचं ते म्हणाले.

//<><><><><><>//